नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १३ पंचायत समित्यांच्या निवडणूका-२०१९ साठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.१२/ का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६ मार्च, २०१९

प्रति,
१) विभागीय आयुक्त ,नागपूर
२) जिल्हाधिकारी ,नागपूर

**विषय :-** नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १३ पंचायत समित्यांच्या निवडणूका-२०१९ साठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम.
(मुदत संपण्याचा दिनांक अनुक्रमे दिनांक २०/०३/२०१७ व १३/०३/२०१७)

**संदर्भ :-** १) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.६६७६/२०१६ मधील मा.न्यायालयाचा दि.२७/०८/२०१८ रोजीचा निर्णय
२) राज्य निवडणूक आयोगाने प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना पाठविलेले समक्रमांकाचे दिनांक ०९ सप्टेंबर, २०१८ व १० जानेवारी, २०१९ रोजीची पत्रे
३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०११/ प्र.क्र.१२/का.७, दिनांक २९/०९/२०११
४) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक. रानिआ/जिपपंस-२०११/ प्र.क्र.१४/का.७, दि.०४/१०/२०११ व दि.११/०६/२०१४
५) राज्य निवडणूक आयोगाची समक्रमांकाची दिनांक २९ मार्च, २०१९ ची अधिसूचना

महोदय,

भारतीय घटनेच्या ७३ व ७४ व्या घटना दुरुस्ती अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, त्यांच्या मुदत संपण्यापूर्वी निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२.    स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे तीन टप्प्यांसाठी (प्रभाग रचना, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन व प्रत्यक्ष निवडणुका) लागणाऱ्या सुमारे ६ महिन्याचा कालावधी लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्र व हद्दी मध्ये ६ महिने शिल्लक असताना बदल करण्यात येऊ नये, असे राज्य निवडणूक आयोगाने दि. २७/०१/२००५ रोजी स्थायी आदेश निर्गमित केले आहेत.

३.    संविधानामध्ये स्पष्ट तरतुदी असतानाही राज्यामध्ये नागपूर व तसेच वाशिम, अकोला, धुळे व नंदुरबार या ५ जिल्हा परिषदा व त्यांतर्गत पंचायत समित्यांच्या निवडणुका त्यांच्या मुदती संपण्यापूर्वी घेतल्या जाऊ शकल्या नाहीत. याची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

(i) राज्य शासनाद्वारे नागपूर जिल्ह्यामध्ये पारशिवनी, वानाडोंगरी व बुटीबोरी अशा ३ नगरपरिषदा/नगरपंचायती अनुक्रमे दि.२५/१०/२०१६, दि.२६/१०/२०१६ व दि.१८/०४/२०१८ रोजी नव्याने गठीत करण्यात आल्या.

(ii) मा. उच्च व मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये खालील कारणास्तव दाखल झालेल्या अनेक रिट याचिका-

अ) नव्याने गठीत करण्यात आलेल्या नगरपरिषद व नगरपंचायती व,

ब) जिल्हा परिषदेमध्ये राखीव जागांचे आरक्षण ५० टक्यांपेक्षा जास्त असू नये

उपरोक्त दाखल झालेल्या सर्व रिट याचिकांवर देण्यात आलेल्या निर्णयांचा गोषवारा सोबत जोडलेल्या **(परिशिष्ट -१)** आहे.

४.    मा. उच्च व मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या सर्व रिट याचिकांच्या निकालांचा सारांश खालीलप्रमाणे आहे :-

i) नागपूर जिल्ह्यातील नव्याने गठीत केलेल्या पारशिवनी व वानाडोंगरी नगरपरिषदा व नगरपंचायतीची स्थापना वैध आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मा. उच्च न्यायालयाचे दि.१२/०१/२०१७ चे आदेशानंतर दि.२४ जुलै २०१८ रोजी पारशिवनी नगरपंचायत व वानाडोंगरी नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया पार पाडली.

ii) राज्य शासनाने नव्याने गठीत केलेली बुटीबोरी नगरपरिषदेची स्थापना वैध आहे.

iii) जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षणाबाबत राज्य शासनाने ३ महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा व तोपर्यंत निवडणुका घेण्यात येऊ नयेत.

५. मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने आता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा विचार करणे आवश्यक आहे :-

i) नव्याने गठीत झालेल्या बुटीबोरी नगरपरिषदेची निवडणूक घेणे, व

ii) जिल्हापरिषदेच्या ५० % आरक्षणाबाबत राज्य शासनाने ३ महिन्याच्या आत निर्णय न घेतल्यामुळे त्यांच्या निवडणुका घेणे.

६. मा. उच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी दिलेली ३ महिन्यांची मुदत संपली असली तरीही राज्य शासनाने याबाबत अजून कसलाही निर्णय घेतलेला नाही.

७. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे राज्य शासनाने त्वरीत निर्णय घ्यावा, असे राज्य निवडणूक आयोगाने वारंवार पत्र, बैठक व दूरध्वनीद्वारे राज्य शासनाला सूचित केले असले (पत्र दि.०९/०९/२०१८ व दि.१०/०१/२०१९, बैठक दि.२०/०२/२०१९ व दूरध्वनीद्वारे) तरी राज्य शासनाने ५० टक्के आरक्षणाबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही.

८. मा. उच्च न्यायालय, नागपूर व औरंगाबाद यांनी दिलेला ३ महिन्याचा कालावधी संपला असल्याने व त्यात मा. उच्च न्यायालयाने कसलीही मुदतवाढ दिलेली नसल्याने, नागपूर, वाशिम, अकोला, धुळे व नंदुरबार जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्या तसेच बुटीबोरी नगर परिषदेची निवडणूक घेण्याबाबत आता कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

९. भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३E व २४३K मध्ये खालीलप्रमाणे तरतुदी आहेत :-

**Article 243E**

............Every Panchayat, unless sooner dissolved under any law for the time being in force, shall continue for five years from the date appointed for its first meeting and no longer ........

.......... An election to constitute a Panchayat shall be completed,- before the expiry of its duration .........

**Article 243K**

............. The superintendence, direction and control of the........ conduct of, all elections to the Panchayats shall be vested in a State Election Commission........

९.२ संविधानातील वरील तरतुदीवरुन स्पष्ट होते की, कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था फक्त ५ वर्षापर्यंत अस्तित्वात राहू शकते व तसेच सदर संस्थेची निवडणूक ५ वर्षाच्या आत राज्य निवडणूक आयोगाने घेणे क्रमप्राप्त आहे.

९.३ वरील वस्तुस्थिती लक्षात घेता मा. उच्च न्यायालयाने राज्य शासनास दिलेली ३ महिन्याची मुदत संपली असल्याने व त्यात कसलीही मुदतवाढ दिली नसल्याने नागपूर, वाशिम, अकोला, धुळे व नंदूरबार या ५ जिल्हा परिषदा व *त्याअंतर्गत* पंचायत समित्या तसेच बुटीबोरी नगर परिषदेची निवडणूक घेण्यासंदर्भात कसलेही बंधन नाही या निष्कर्षापर्यंत राज्य निवडणूक आयोग पोहचला आहे.

१०. सबब, नागपूर जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १३ पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेसाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:-

**आदेश**

११. नव्याने गठीत केलेल्या बुटीबोरी नगरपरिषदेचे क्षेत्र वगळून नागपूर जिल्ह्याच्या उर्वरित ग्रामीण क्षेत्रासाठी २०११ च्या जनगणनेवर आधारित जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९(१) अन्वये जिल्हा परिषदेकरिता एकूण जागा ५८ निश्चित करण्यात आल्या आहेत. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/जिपपंस/२०१८/प्र.क्र.१२/का.७ दि. २६ मार्च, २०१९ अन्वये अधिसूचना निर्गमित केलेली आहे. (<u>परिशिष्ट-२</u>)

(११.१) अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेस देय असलेल्या एकूण ५८ सदस्य संख्येची पंचायत समिती क्षेत्रनिहाय विभागणी करणे, आरक्षण ठरविणे, त्याअंतर्गत पंचायत समितीस देय असलेल्या जागा व त्यांचे आरक्षण निश्चित करणे ही जिल्हाधिकारी यांची जबाबदारी आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयास उपलब्ध माहितीच्याआधारे जिल्हा परिषद व पंचायत समितीस अनुज्ञेय ठरत असलेल्या सदस्य संख्येबाबतचा तपशिल (आरक्षित प्रवर्गाच्या जागांसह) तयार करण्यात आला असून तो <u>परिशिष्ट-३ व परिशिष्ट-४</u> प्रमाणे आहे. सदरचे परिशिष्ट-३ व

परिशिष्ट-४ हे केवळ उदाहरण म्हणून सोबत जोडण्यात येत आहे. वर नमूद केल्याप्रमाणे यासंदर्भात संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांचीच असल्याने त्यांनी सदरची आकडेवारी काळजीपूर्वक तपासून आवश्यक असल्यास त्यामध्ये योग्य ते फेरबदल, राज्य निवडणूक आयोगाच्या निर्दशनास आणून देण्यात यावेत.

१२. आता या आदेशाद्वारे नागपूर जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती करण्याबाबतचे वेळापत्रक सोबतच्या परिशिष्ट-५ मध्ये देण्यात येत आहे. प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना राज्य निवडणूक आयोगाकडून संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत.

१३. प्रभाग रचना करण्याचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत :-

(i) जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे.

(ii) विभागीय आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेस (आरक्षणासह) मान्यता देणे.

(iii) जिल्हाधिकारी यांनी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे.

(iv) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) राजपत्रात इ. प्रसिध्द करणे

(v) जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त यांनी सुनावणी देणे.

(vi) विभागीय आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना राजपत्रात इ. प्रसिध्दी देणे.

१४. प्रभाग रचना करताना जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**(१४.१) प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे:-**

(i) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ मधील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७, दिनांक ०४/१०/२०११ व

दिनांक ११/०६/२०१४ अन्वये जिल्हाधिकारी यांनी निवडणूक विभाग व निर्वाचक गण यांची अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करावी व त्याचे प्रारुप विहित मुदतीत विभागीय आयुक्त यांना सादर करावेत. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ ही चौथी निवडणूक आहे. त्यामुळे सन २००२, २००७ व २०१२ मध्ये असलेले आरक्षण विचारात घेऊन या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

(ii) उपरोक्त दि.०४/१०/२०११ च्या आदेशात नमूद परिच्छेद-२(६-अ) बाबत स्पष्ट करण्यात येते की, अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची लोकसंख्या १० टक्के मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त होत असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबत समर्थनीय कारणे नमूद करुन प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांनी दिलेली कारणे संयुक्तिक आहेत किंवा नाहीत हे तपासून प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

**(१४.२) जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) प्रस्तावांना विभागीय आयुक्तांनी विहित मुदतीत मान्यता दयावी.**

**(१४.३) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला आरक्षणाची सोडत :-**

प्रारूप प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त यांचेकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त परिच्छेद १४.१ (i) मधील नमूद नियम व आदेशानुसार नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणाची सोडत काढण्याबाबतची जिल्हाधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी :-

अ) जिल्हा परिषदांच्या बाबतीत जिल्हा स्तरावर ही सोडत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समित्यांच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी, संबंधित तहसिलदारांकडून काढण्यात यावी.

ब) तालुका मुख्यालयात काढण्यात येणाऱ्या सोडतीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समित्यांकरिता एक उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करावी.

क) निवडणूक विभाग, निर्वाचक गणांच्या हद्दी दर्शविणारा नकाशामध्ये विभाग व गण यांचे क्रमांक व त्यांच्या व चतु:सीमा स्पष्ट कराव्यात व हा नकाशा सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

ड) सोडतीसाठी पारदर्शक ड्रम / काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ x १५ से.मी.पेक्षा जास्त नसावा. त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावेत.

इ) सोडतीसंबंधीच्या सूचनेस जिल्हास्तर व तालुकास्तरावर नेमून दिलेल्या दिनांकास मोठया प्रमाणात प्रसिध्दी दयावी. उदा.

(a) जिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील नोटीस बोर्ड

(b) जिल्हा कार्यालय/जिल्हा परिषदेची वेबसाईट

© जिल्हयातील जास्त वाचकवर्ग असलेल्या वर्तमानपत्रात

(d) केबल टी.व्ही. व इतर माध्यमे, इत्यादी.

**(१४.४) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) प्रसिध्द करणे .**

(i) नगर परिषदा /नगर पंचायतीच्या बाबतीत "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५" मधील तरतुदीनुसार सर्व आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. त्याच धर्तीवर जिल्हा परिषद / पंचायत समित्यांमध्ये देखील सोडतीमध्ये आलेले आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली कार्यपध्दती योग्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक-३६४८/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयात नमूद केलेले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समान पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याने, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांसह) यांच्याकरिता प्रभाग आरक्षित करुनच प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करावी.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेच्या अधिसूचनेस व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व स्विकारण्यास सक्षम असलेले प्राधिकारी यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट इत्यादी.)

**(१४.५) <u>प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे :-</u>**

(i) जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रारुप प्रभाग रचनेवर विहित मुदतीत प्राप्त हरकती जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्या विभागीय आयुक्तांना सादर कराव्यात.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींवर विभागीय आयुक्त यांनी स्वत: सविस्तर सुनावणी दयावी. असे करीत असताना जास्तीत जास्त पारदर्शकता राखली जाईल याची काळजी घ्यावी. निकाली काढण्यात येणाऱ्या हरकतींबाबतही, संबंधीतांना कायदयातील तरतुदी, भौगोलिक रचना, बदलांची आवश्यकता / अनावश्यकता यांच्याआधारे योग्य तो खुलासा करावा, जेणेकरुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे कमी होतील. मात्र हरकतदारांना लेखी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

(iii) सुनावणीनंतर विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम करावे.

**(१४.६) <u>अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व प्रसिध्दी करणे</u>-**

विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी त्यासंबंधीची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व सदर अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट इत्यादी.) तसेच अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

१५. **सर्वसाधारण**

या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

१६. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रभाग रचना अंतिमरित्या प्रसिध्द होईपर्यंत सर्व टप्प्यांवरील माहिती (विहित नमुन्यात) आयोगाच्या कार्यालयास ई-मेल sec.mh@gov.in वर वेळच्यावेळी पाठविण्यात यावी.

१७. वरील नमूद प्रकरणांबाबत मा. न्यायालयाचे अन्य काही आदेश असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करावी आणि जर न्यायालयाचे काही आदेश असतील तर त्याबाबत वस्तुस्थिती आयोगाच्या त्वरीत निर्दशनास आणून आणावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सोबत- परिशिष्ट-१ ते ५

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४०० ००१

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.१२/का.७, दि. २६/०३/२०१९ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट-१

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव व मुदत संपण्याचा दिनांक | प्रभाग रचना व आरक्षणासाठी राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या पत्राचा दिनांक | मुदतपूर्व निवडणुका न घेण्याची कारणे | मा. उच्च / सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या याचिका व निकालाचे दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | **नागपूर जिल्हा परिषद**<br>२०.३.२०१७<br>**पंचायत समिती**<br>१३.३.२०१७ | (राज्य निवडणूक आयोगाने दोनदा कार्यक्रम निर्गमित केला)<br>i) १८.८.२०१६ | राज्य शासनाने दि. २५.१०.१६ व २६.१०.१६ रोजी अनुक्रमे पारशिवनी व वानाडोंगरी नगरपरिषद, नगरपंचायत नव्याने गठीत केली.<br>राज्य निवडणूक आयोगाचे स्थायी आदेश दि. २७.१.२००५ प्रमाणे पारशिवनी व वानाडोंगरी नगरपरिषद हा नागरी भाग ग्राह्य धरता येत नाही असे राज्य निवडणूक आयोगाचे दि. ३.११.२०१६ च्या पत्रान्वये राज्य शासनास कळवून प्रभाग रचनेची प्रक्रिया चालू ठेवली व दि. २५.११.२०१६ या तारखेला पूर्ण केली. | उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर<br>११२/२०१६<br>दि.१२.०१.२०१७<br>उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर<br>१६५/२०१६<br>दि.१२.०१.२०१७<br>उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर<br>६६७२/२०१६<br>दि.१२.०१.२०१७<br>उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर<br>६६७६/२०१६<br>दि.२७.०८.२०१८<br>**सर्वोच्च न्यायालय, दिल्ली**<br>५८४१/२०१७<br>दि.०६.०२.२०१८ | राज्य शासनाने गठीत केलेल्या पारशिवनी नगरपंचायत व वानाडोंगरी नगरपरिषद यांना मा. न्यायालयाने ग्राह्य धरले.<br>राज्य शासनाने नवनिर्मित पारशिवनी नगर पंचायत व वानाडोंगरी नगर परिषद यांच्या निवडणुका दि. २४.७.२०१८ ला पूर्ण केल्या. |
| | | ii) १५.०३.२०१८ | राज्य शासनाने दि.१४/०४/२०१८ रोजी बुटीबोरी नगरपरिषद १४.०४.२०१८ नव्याने गठीत केली. | उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर<br>२४३३/२०१८<br>दि.२७.०८.२०१८ | बुटीबोरी ही नवीन नगरपरिषद स्थापन करण्याची राज्य शासनाची कृती न्यायालयाने ग्राह्य धरली.<br>मात्र जिल्हा परिषदेमध्ये ५० % पेक्षा जास्त आरक्षणासंदर्भात राज्य शासनाने ३ महिन्याच्या आत निर्णय घ्यावा व तोपर्यंत राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेऊ नये असे उच्च न्यायालयाने आदेशित केले. |

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव व मुदत संपण्याचा दिनांक | प्रभाग रचना व आरक्षणासाठी राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या पत्राचा दिनांक | मुदतपूर्व निवडणुका न घेण्याची कारणे | मा. उच्च / सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या याचिका व निकालाचे दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| २ | **वाशिम जिल्हा परिषद**<br>२९.१२.२०१८<br>**पंचायत समिती**<br>२७.१२.२०१८ | २७.७.२०१८ | जिल्हा परिषदेमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त आरक्षण असल्याने मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमध्ये दि.२७.०८.२०१८ रोजी दिलेली स्थगिती | उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर<br>५३३३/२०१८<br>दि.२७.८.२०१८ | जिल्हा परिषदेमध्ये ५० % पेक्षा जास्त आरक्षणासंदर्भात राज्य शासनाने ३ महिन्याच्या आत निर्णय घ्यावा व तोपर्यंत राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेऊ नये असे उच्च न्यायालयाने आदेशित केले आहे. |
| ३ | अकोला जिल्हा परिषद<br>२९.१२.२०१८<br>पंचायत समित्या<br>२७.१२.२०१८ | २७.७.२०१८ | | | |
| ४ | धुळे जिल्हा परिषद<br>२९.१२.२०१८<br>पंचायत समित्या<br>२७.१२.२०१८ | २७.७.२०१८ | जिल्हा परिषदेमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त आरक्षण असल्याने मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमध्ये दि.१९.०९.२०१८ रोजी दिलेली स्थगिती | उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद<br>९९१४/२०१८<br>दि.१९.०९.२०१८<br>उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद<br>१०५४३/२०१८<br>दि.१९.९.२०१८ | |
| ५ | नंदूरबार जिल्हा परिषद<br>२९.१२.२०१८<br>पंचायत समित्या<br>२७.१२.२०१८ | २७.०७.२०१८ | | उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद<br>१०२४५/२०१८<br>दि.१९.०९.२०१८ | |

परिशिष्ट-२

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र:रानिआ/जिपपंस/२०१८/प्र.क्र.१२/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २६ मार्च, २०१९

## अधिसूचना

क्रमांक: रानिआ/जिपपंस/२०१८/प्र.क्र.१२/का.७ - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ ( १९६२ चा महा.५) (यानंतर याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा केला आहे.) चे कलम ९ च्या उपकलम (१) मधील तरतुदीनुसार आणि यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन, राज्य निवडणूक आयोग, सन २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे, खालील तक्त्यातील रकाना क्र.२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या बाबतीत त्या जिल्हा परिषदेच्या नावासमोर रकाना क्र.३ मध्ये नमूद केलेल्या संख्येइतकी सदस्य संख्या आगामी निवडणुकीकरिता निश्चित करीत आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ५८(१)(अ) नुसार जिल्हा परिषदेचा प्रत्येक निवडणूक विभाग दोन निर्वाचक गणांमध्ये विभागण्यात येईल.

अनुसूची

जिल्ह्यानुसार जिल्हा परिषदेस देय होणारी सदस्य संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा परिषद | निश्चित केलेली एकूण सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | नागपूर | ५८ |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

परिशिष्ट-३

## नागपूर जिल्हा परिषदेत अनुज्ञेय ठरत असलेल्या निवडणूक विभागांच्या संख्येबाबतचा तपशील

| DISTRICT | TOTAL POPULATION AS PER CENSUS 2011 | RATIO 114819 (DECIMAL) | CENSUS POPULATION 2011 | | | Z.P. SEATS | TOTAL WOMAN | DETAILS REGARDING RESERVATION | | | | | | | | P.S. SEATS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | GEN | | SC | | ST | | BCC | | |
| | | | TOTAL | SC | ST | | | T | W | T | W | T | W | T | W | |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| NAGPUR | 1642536 | 7.87 | 1642536 | 279274 | 211338 | 58 | 29 | 25 | 12 | 10 | 5 | 7 | 4 | 16 | 8 | 116 |

## जिल्हा परिषद सदस्य संख्या निश्चित करण्याचे सूत्र

म्हणजे राज्याच्या जिल्हयातील सर्वात जास्त लोकसंख्या (अहमदनगर - **3608932** )

म्हणजे राज्याच्या जिल्हयातील सर्वात कमी लोकसंख्या (सिंधुदुर्ग - **738447** )

तील सुत्रानुसार = $\frac{(\text{क्ष} - \text{य})}{25} = \frac{(3608932 - 738447)}{25} = \frac{(2870485)}{25} = 114819$

परिशिष्ट-४

## नागपूर जिल्हा परिषदेतील अनुज्ञेय जागांचा पंचायत समिती क्षेत्रनिहाय तपशिल तसेच पंचायत समित्यांना अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांचा तपशील

| DISTRICT | PANCHAYAT SAMITI | CENSUS POPULATION 2011 | | | DECIMAL | ADMISSIBLE SEATS | | TOTAL WOMEN | Reservation | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| | | TOTAL | SC | ST | | ZP | PS | | T | W | T | W | T | W | T | W |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| NAGPUR | NARKHED | 118003 | 18482 | 13864 | 4.167 | 4 | 8 | 4 | 4 | 3 | 1 | 0 | 1 | 0 | 2 | 1 |
| | KATOL | 120541 | 18843 | 17959 | 4.256 | 4 | 8 | 4 | 4 | 3 * | 1 | 0 | 1 | * | 2 | 1 |
| | KALMESHWAR | 85457 | 13620 | 8019 | 3.018 | 3 | 6 | 3 | 2 | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 2 | 1 |
| | SAONER | 180631 | 37696 | 17797 | 6.378 | 6 | 12 | 6 | 5 | 2 | 3 | 2 | 1 | 0 | 3 | 2 |
| | PARSSIONI | 103142 | 16411 | 11581 | 3.642 | 4 | 8 | 4 | 4 | 3 * | 1 | * | 1 | 0 | 2 | 1 |
| | RAMTEK | 136333 | 15528 | 50428 | 4.814 | 5 | 10 | 5 | 2 | 0 | 1 | 1 | 4 | 2 | 3 | 2 |
| | MOUDA | 125170 | 16392 | 8405 | 4.420 | 5 | 10 | 5 | 5 | 3 | 1 | 0 | 1 | 0 | 3 | 2 |
| | KAMPTEE | 118139 | 19650 | 6507 | 4.172 | 4 | 8 | 4 | 5 | 3 * | 1 | * | 0 | 0 | 2 | 1 |
| | NAGPUR (RURAL) | 177246 | 34719 | 18267 | 6.259 | 6 | 12 | 6 | 6 | 3 * | 2 | 1 | 1 | * | 3 | 2 |
| | HINGNA | 196195 | 32598 | 27194 | 6.928 | 7 | 14 | 7 | 6 | 3 | 2 | 1 | 2 | 1 | 4 | 2 |
| | UMRED | 100209 | 19448 | 15713 | 3.539 | 4 | 8 | 4 | 3 | 2 | 2 | 1 | 1 | 0 | 2 | 1 |
| | KUHI | 113541 | 22830 | 4103 | 4.009 | 4 | 8 | 4 | 4 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 2 | 1 |
| | BHIWAPUR | 67929 | 13057 | 11501 | 2.399 | 2 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 1 |
| | **TOTAL** | **1642536** | **279274** | **211338** | **58.00** | **58** | **116** | **58** | **51** | **30*** | **19** | **7 *** | **15** | **3 *** | **31** | **18** |

नागपूर जिल्हा परिषदेस एकूण ५८ इतकी सदस्य संख्या अनुज्ञेय ठरत आहे. या सदस्य पदांचे निवडणूक विभागामध्ये वाटप करुन देणे आवश्यक असल्याने मौदा पंचायत समितीसाठी जरी ४.४२ एवढा अपूर्णांक येत असला तरी ५ सदस्य पदांचे वाटप करण्यात आले आहे.

नरखेड, काटोल, कळमेश्वर, मौदा, भिवापूर या ५ पंचायत समित्यांमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता प्रत्येकी १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होणार नाही.

रामटेक पंचायत समितीमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होईल.

पारशिवनी व कामटी या २ पंचायत समित्यांमध्ये यावेळी अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी प्रत्येकी केवळ १ जागा आरक्षित होत आहे. सदर जागा अनुसूचित जाती(स्त्री) करिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीद्वारे ठरवावे लागेल. सोडतीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यास त्या पंचायत समित्यांमधील सर्वसाधारण (स्त्री) या प्रवर्गाची सदस्य संख्या एकने कमी होईल.

नरखेड, कळमेश्वर, सावनेर, पारशिवनी, मौदा, उमरेड व भिवापूर या ७ पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जमाती या प्रवर्गाकरिता फक्त १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जमाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जमाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होणार नाही.

काटोल व नागपूर (ग्रामीण) या २ पंचायत समित्यांमध्ये यावेळी अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी प्रत्येकी केवळ १ जागा आरक्षित होत आहे. सदर जागा अनुसूचित जमाती(स्त्री) करिता आरक्षित होतील किंवा कसे हे सोडतीद्वारे ठरवावे लागेल. सोडतीमध्ये सदर जागा अनुसूचित जमाती (स्त्री) प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यास सर्वसाधारण (स्त्री) या प्रवर्गासाठी जागा त्याप्रमाणात कमी होतील.

भिवापूर पंचायत समितीस ४ जागा देय होत असून २ जागा स्त्री साठी आरक्षित करावयाच्या आहेत. एकूण सदस्य संख्येपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण या प्रवर्गासाठी प्रत्येकी एक जागा देय होत आहे. मागील निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील जागा स्त्रियांकरिता आरक्षित होत्या. त्यामुळे आता अनुसूचित जाती(स्त्री) व अनुसूचित जमाती (स्त्री) प्रवर्गासाठीची जागा आरक्षित होणार नाही. त्यामुळे सर्वसाधारण प्रवर्गाची १ जागा व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची १ जागा अश्या २ जागा स्त्रियांसाठी आरक्षित होतील.

(आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र. १२/का.७, दि. २६ मार्च, २०१९ सोबतचे प्रपत्र)

परिशिष्ट-५

**नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १३ पंचायत समित्यांच्या**
**सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम**

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीकरिता आरक्षणासह) विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे** (जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभागामध्ये व पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणामध्ये विभागणी करुन) | जिल्हाधिकारी | १८/०४/२०१९ (बुधवार) पर्यंत |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे | विभागीय आयुक्त | २५/०४/२०१९ (गुरुवार) पर्यंत |
| ३. | **आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे** {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत} | जिल्हाधिकारी | २७/०४/२०१९ (शनिवार) |
| ४. | **आरक्षणाची सोडत काढणे** {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत} | | |
| | क) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | ३०/०४/२०१९ (मंगळवार) |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | तहसिलदार | |
| ५. | **प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करणे** (निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना व आरक्षणासह) | जिल्हाधिकारी | ०२/०५/२०१९ (गुरुवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| ६. | जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | | ०२/०५/२०१९ (गुरुवार) ते ०६/०५/२०१९ (सोमवार) पर्यंत |
| ७ | प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन निवडणूक विभाग /निर्वाचक गण रचना अंतिम करणे | विभागीय आयुक्त | १०/०५/२०१९ (शुक्रवार) पर्यंत |
| | **क) अंतिम प्रभाग रचना** | | |
| ८. | अंतिम प्रभाग रचना व आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १३/०५/२०१९ (सोमवार) पर्यंत |

**टिप :- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र